# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४००००१

दूरध्वनी - २६२०६०१, २६१०६०२ २६४११५०/५१, फॅक्स - २६९२१०२.

E-mail :desk2a@dtemaharashtra.gov.in Internet :http://www.dtemaharashtra.gov.in


तात्काल/न्यायालयीन प्रकरण

क्र.२अ/एडीएम / २०१८/ १५८५

दि. 12 DEC 2018

प्रति,

सहसंचालक,

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

मुंबई/पुणे/नाशिक/नागपूर/अमरावती/औरंगाबाद

विषय : शै.वर्ष २०१८-१९ मध्ये प्रथम वर्ष अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रमात जात वैधता प्रमाणपत्रा अभावी प्रवेश रदद केलेल्या उमेदवारांबाबत माहिती

संदर्भ : मा.सहाय्यक सरकारी वकील, उच्च न्यायालय, मुंबई यांचे पत्र क्रमांक : GP/WP/VMM/१२३५३, दिनांक १२/१२/२०१८

उपरोक्त विषयाबाबत आपणांस कळविण्यात येते की, आपल्या विभागातील सर्व अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये प्रथम वर्ष अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रमात जात वैधता प्रमाणपत्रा ऐवजी जात वैधता प्रमाणपत्र मिळण्यासाठी केलेल्या अर्जाची पावती सादर करुन केंद्रीभूत प्रवेश प्रकियेमार्फत प्रवेश घेतलेल्या उमेदवारांना प्रवेश नियत्रंण प्राधिकरणाने निश्चित केलेल्या कालावधीत दिनांक २५/८/२०१८ पर्यंत जात वैधता प्रमाणपत्र सादर करावयाचे होते. तथापि सदर प्रमाणपत्र सादर करु न शकल्याने संस्थानी प्रवेश रदद केलेल्या शाखानिहाय उमेदवारांची संख्या तसेच विहित मुदतीनंतर संबंधित उमेदवाराकडे जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त झालेले असल्यास अश्या उमेदवारांची संख्या मा.उच्च न्यायालयास सादर करावयाची आहे.

तसेच आज रोजी संस्थेमध्ये प्रथम वर्ष अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रमात रिक्त जागांची माहिती सुदधा सादर करावयाची आहे. सदर माहिती मा.उच्च न्यायालयात सादर करावयाची असल्याने प्रथम प्राधान्याने माहिती दिनांक १३/१२/२०१८ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत ईमेल व्दारे(:desk2a@ dtemaharashtra.gov.in ) पाठविण्यात यावी.

(डॉ.अभय वाघ)

संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई

प्रत माहितीस्तव सादर:

१) मा. सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई

२) मा.आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य, मुंबई

\\192.168.1.9\Desk2a\Desk 2a (Sumit)\2018-19\letter 2018-19 (Autosaved).docx

प्र.क्र.:- विकाअ/शिक्षण/माहिती/२०१८/ 2979
सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय अमरावती
दिनांक :- 13 DEC 2018

प्रत :- प्राचार्य सर्व अभियांत्रिकी पदवी संस्था अमरावती विभाग अमरावती यांना कळविण्यात येते की, सदरची माहिती आज दिनांक १३/१२/२०१८ रोजी दु.3.00 वाजेपर्यंत या कार्यालयात सादर करावी.

सहसंचालक, तंत्र शिक्षण,
विभागीय कार्यालय, अमरावती

[illegible]